महाराष्ट्र शासन



आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय,

सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई

शासकीय कार्यालयांसाठी १०० दिवसांसाठी सात कलमे कृती आराखडा

१. संकेतस्थळ (Website)

सध्याचे संकेतस्थळ

- mahadma.maharashtra.gov.in
- २०१५ साली NIC, पुणे यांच्याकडून विकसित.
- संकेतस्थळाचे सिक्युरीटी ऑडीट पूर्ण
- SSL Certificate ने सुरक्षित.
- महाराष्ट्र लोकसेवा अधिनियम २०१५ च्या अनुषंगाने माहिती अद्ययावत.
- संचालनालय स्तरावरील माहिती संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत. (उदा. निविदा, उपक्रम, योजना, सेवा, बातम्या, परिपत्रके, भरती प्रक्रिया,जाहिराती, विभागांची माहिती, RTI, RTS ई.)

सद्यस्थिती

NIC मार्फत Support नाही.

50%

जुने तंत्रज्ञान वापरून बनविलेली Website

50%

संकेतस्थळात बदल करणे कठीण

50%

Website Slowness

50%

नविन बनविण्यात येणारे संकेतस्थळ

- संचालनालयाकरिता GIGW च्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे नव्याने संकेतस्थळ विकसित करणेसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण.
- निम्नतम निविदाधारकास दि.२७ मार्च २०२५ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.
- नविन संकेतस्थळ CLOUD BASED असेल.
- १०० दिवस कार्यक्रम अंतर्गत संचालनालयाची अद्यावत संकेतस्थळ कार्यादेश दिल्यावर ३ महिन्यात तयार होईल.
- नविन तंत्रज्ञान वापरून तयार करण्यात येणारे संकेतस्थळ Chat Bot सह असणार आहे.

१. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत संचालनालयाची संपूर्ण माहिती कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

२. राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींद्वारे नागरीकांना दिल्या जाणा-या विविध लोकसेवा ह्या विहित मुदतीत मिळाव्यात, ह्या उद्देशाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत **एकुण ७० लोकसेवा** ह्या विभागाद्वारे अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत. सदर लोकसेवांपैकी **५६ लोकसेवा** ह्या इंटीग्रेटेड सिटीजन सर्व्हीस पोर्टल, आपले सरकार सेवा पोर्टल व इतर ऑनलाइन पोर्टल्स द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत १४ सेवा ऑनलाइन माध्यमातुन उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

२. केंद्र शासनाची सुसंवाद
(Coordination with the central government)

१. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) मधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधण्यास अनुदान (BLC) या घटकांतर्गत २,३९,५२४ घरकुले बांधणीचे सुधारित उद्दिष्ट असून यापैकी १,३७,७७९ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून ७२,४५८ घरकुले बांधकामांच्या विविध टप्प्यावर आहेत. **म्हणजेच या योजनेअंतर्गत BLC घटकाचे एकूण उद्दिष्टापैकी ८७.७७% घरकुले प्रगतीपथावर आहेत.**

२. Prime Minister Street Vendors Aatmnirbhar Nidhi (PMSVANidhi) (This Mission has Closed from Dec २०२४ and New pahse २ is awaiting)

Sr. No.	Tranches	Target	Achievement (Disbursement)	Percentage
1	First Tranche (Rs. 10,000)	9,24,000	8,52,518	92%
2	Second Tranche (Rs. 20,,000)	1,64,450	2,01,442	122%
3	Third Tranche (Rs. 50000)	19,270	32,113	167%

३. Svanidhi Se Samridhi (Program under PMSVANidhi)

Socio Economic Profiling of Street vendors

Sr. No	Target	Achievement	Percentage
1	849733	423971	50%

केंद्र शासन महत्वाची प्रलंबित अनुदाने				
अ.क्र.	**विषय**	**कालावधी**	**प्रलंबित थकीत अनुदान**	**शेरा**
१	१५ वा वित्त आयोग (Million Plus Cities)	२०२३-२४	र.रु. ८७५ कोटी.	• १५ वा वित्त आयोग अंतर्गत सन २०२३-२४ आणि सन २०२४-२५ या वित्तीय वर्षातील अनुदान प्राप्तीकरिता केंद्र शासनाकडे परिपूर्ण प्रस्ताव सादर केलेला आहे. • अनुदान प्राप्तीकरिता City Finance Portal वरील Annual accounts, Detailed Utilization Report, Property Tax, 28SLBs, ODF, GFC या सर्व अटींची पूर्तता राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका आणि कटक मंडळ यांच्याकडून करून घेण्यात आलेली आहे. • <u>प्रलंबित थकीत अनुदानाकरिता संचालनालय तसेच शासनाच्या वतीने सदर अनुदान मिळण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.</u>
२	१५ वा वित्त आयोग (Non-Million Plus Cities)	२०२३-२४	र.रु. ५०५ कोटी.	
३	१५ वा वित्त आयोग (Million Plus Cities)	2024-25	र.रु. 928 कोटी.	
४	१५ वा वित्त आयोग (Non-Million Plus Cities)	2024-25	र.रु. 1070 कोटी.	

३. स्वच्छता (Cleanliness)

विशेष मोहीम राबवून संचालनालयातील अभिलेख्यांचे निंदणीकरण
तसेच वर्गीकरण "अ" "ब" "क" "ड" मध्ये पूर्ण करण्यात आले

संचालनालयातील कालबाह्य निकामी व निरुपयोगी अंदाजे ६०० kg रद्दी तसेच निरुपयोगी प्रिंटर, कॉफी मशीन, इतर अनुषंगिक इलेक्ट्रॉनिक वस्तूंची लिलाव पद्धतीने करून विल्हेवाट लावण्यात आली.

जुनी वाहने नसल्याने वाहनाचे निर्लेखन निरंक आहे.

BEFORE

AFTER

BEFORE

AFTER

४. जनतेच्या तक्रारींचे निवारण (Grievance Redressal)

नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींचे तत्पर्तने निराकरण करण्यात येते. त्याबाबत दिनांक २०.०१.२०२५ रोजीची स्थिती व दिनांक ०७.०४.२०२५ रोजीच्या स्थितीचे अवलोकन केलेअसता प्रलंबित तक्रारींची तत्परतेने दखल घेऊन निराकरण तसेच निकाली काढण्यात आलेल्या आहेत.

पी.जी. पोर्टल - विभागनिहाय तक्रारींची स्थिती									
अ. क्र.	विभाग	दि. २०.०१.२०२५ रोजीची स्थिती				दि. ०७.०४.२०२५ रोजीची सद्यस्थिती			
		एकूण	निकाली	प्रलंबित	प्रलंबितता (%)	एकूण	निकाली	प्रलंबित	प्रलंबितता (%)
१	**अमरावती**	१५७	१४५	१२	८%	१८८	१६७	२१	११%
२	**छत्रपती संभाजीनगर**	१९६	१६२	३४	१७%	२१२	१८९	२३	११%
३	**कोकण**	१६४	११८	४६	२८%	१४१	१३७	४	३%
४	**नागपूर**	१६७	१२३	४४	२६%	१७२	१४१	३१	१८%
५	**नाशिक**	१८०	१६८	१२	७%	२११	१९६	१५	७%
६	**पुणे**	१७२	१४०	३२	१९%	१७४	१६७	७	४%
एकूण		**१०३६**	**८५६**	**१८०**	**१७%**	**१०९८**	**९९७**	**१०१**	**९%**

आपले सरकार - विभागनिहाय तक्रारींची स्थिती									
अ. क्र.	विभाग	दि. २०.०१.२०२५ रोजीची स्थिती				दि. ०७.०४.२०२५ रोजीची सद्यस्थिती			
		एकूण	निकाली	प्रलंबित	प्रलंबितता (%)	एकूण	निकाली	प्रलंबित	प्रलंबितता (%)
१	अमरावती	१४४६	१३८३	६३	४%	१५८३	१५११	७२	५%
२	छत्रपती संभाजीनगर	११५८	८७८	२८०	२४%	११७३	९९८	१७५	१५%
३	कोकण	१६२८	१५८२	४६	३%	१८८०	१७९५	८५	५%
४	नागपूर	८७६	६३८	२३८	२७%	९८१	८६७	११४	१२%
५	नाशिक	१०२०	९९४	२६	३%	११४९	१०९९	५०	४%
६	पुणे	१३२४	११५३	१७१	१३%	१४७६	१४१६	६०	४%
एकूण		७४५२	६६२८	८२४	११%	८२४२	७६८६	५५६	७%

५. कार्यालयातील सोयी व सुविधा (Office Amenities)

- संचालनालयातील कर्मचारी वर्ग तसेच येणारे अभ्यागत यांचे करिता पिण्याच्या पाण्याची योग्य व कायमस्वरूपी व्यवस्था आहे.
- महिला कर्मचारी आणि अभ्यागत यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा उपलब्ध आहे.
- संचालनालयामध्ये येणाऱ्या अभयांगतांसाठी सुसज्ज असे प्रतिक्षालय ठेवण्यात आले आहे.
- अभ्यागतांच्या सोयीकरिता नामफलक व दिशादर्शक फलक लावण्यात आले आहे
- कार्यालयामध्ये येणाऱ्या अभयांगत यांचे भेटीचे नियोजन करण्यात आले असून त्याबाबत प्रसिद्धी फलक कार्यालयामध्ये लावण्यात आले आहे

६. कामकाजातील सुधारणा (Improved office Procedures)

१. नगरपरिषद प्रशासन संचालनालयातील (मुख्य, विभाग व जिल्हास्तर), सर्व कामकाज (१००%) ई-ऑफिस प्रणाली अंतर्गत सुरु केले आहे.

२. संचालनालयामध्ये ही ई-ऑफिस प्रणाली मार्फत प्रकरणांचा निपटारा ४ स्तरांवर मान्यता देऊन (अधिक्षक ➡ सहा.आयुक्त / उपायुक्त ➡ सह आयुक्त, ➡ मा.आयुक्त तथा संचालक) करण्यात येत आहे.

३. ई-ऑफिसद्वारे निकाली काढलेल्या नसत्यांची टक्केवारी १००% टक्के आहे.

४. जेव्हा वृत्तपत्रात शासन विरोधी बातम्या प्रसिद्ध होत असतात / होतात किंवा परिस्थिती उद्‌भवते, तेव्हा त्याबाबत वेळीच स्पष्टीकरण / खुलासा प्रसिद्ध करण्यात येत असतो.

७. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण सेवाविषयक बाबी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर

१. महाराष्ट्र नगरपरिषद ६ राज्यसेवा संवर्गातील १४५० कर्मचाऱ्यांचे पायाभूत प्रशिक्षण पूर्ण झाले आहेत.

२. मुख्याधिकारी संवर्गातील गट-अ व गट-ब अधिकाऱ्यांची संख्या ६०६ असून महापार प्रणालीवर ६०६ अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याकरिता नोंदणी पूर्ण झालेली आहे. तसेच १२५४ PAR जनरेट करण्यात आले आहे.

३. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे खुद्द कर्मचारी व महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा संवर्गातील (सर्व) कर्मचाऱ्यांचे दि.०१ जानेवारी, २०२५ रोजीची सेवाजेष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

४. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे खुद्द कर्मचाऱ्यांच्या व महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा संवर्गातील एकूण ५०२ कर्मचाऱ्यांना पात्रतेनुसार पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखापाल व लेखापरीक्षक संवर्गातील ९७ कर्मचाऱ्यांना माहे एप्रिल, २०२५ मध्ये पात्रतेनुसार पदोन्नत्या देण्यात आल्या.

५. सन २०२३-२०२४ मध्ये खालील प्रमाणे महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांचा पदोन्नतीबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव शासन नगर विकास विभाग यांना सादर करण्यात आले -

मुख्याधिकारी, गट-अ (नि.श्रे) मधील २६ अधिकाऱ्यांना सह आयुक्त, गट-अ संवर्गात,

मुख्याधिकारी, गट- अ मधील ५० अधिकाऱ्यांना मुख्याधिकारी, गट-अ (नि.श्रे) / उपायुक्त, गट-अ संवर्गात,

मुख्याधिकारी, गट-ब/सहायक आयुक्त,गट-ब मधील ६७ अधिकाऱ्यांना मुख्याधिकारी, गट-अ /सहायक आयुक्त, गट-अ

६. कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा (AI) वापर करण्याकरिता अधिकारी व कर्मचाऱ्यांना यशदा, पुणे मार्फत आयोजित प्रशिक्षणास वेळोवेळी पाठवण्यात आले आहे तसेच नियमित कामकाजामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येत आहे.

७. i-GOT कर्मयोगी भारत

MDO Login वापरून सर्व मुख्याधिकरी व संचालनालयातील कर्मचारी यांचे On-Boarding झालेले आहे.

संचालनालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी ०५ एप्रिल, २०२५ पर्यंत विविध विषयांचे ५ कोर्सेस पूर्ण केले आहे.

कर्मयोगी भारत

लोकहितं मम करणीयम्

८. नाविन्यपूर्ण उपक्रम (Ease Of Living) – I- नगर विकास संचित पोर्टल

- राज्यस्तरीय कोअर आयटी टिम बनविण्यात आली
- संगणकीय विदा कार्यपद्धती बनविण्यात आली
- इन हाउस डेव्हलपमेंट

(https://www.ulbdataportal.in)

फायदे आणि वैशिष्ट्ये

- सर्व नागरी स्थानिक स्व. संस्थांचे वैयक्तिक लॉगीन
- सोप्या पद्धतीने रिपोर्टिंग
- सर्व नगर परिषद, नगर पंचायत, महानगरपालिका यांचे कडून विविध डेटा प्राप्त करून घेता येतो
- १ लॉगीन वापरून सर्व डेटा कधीही प्राप्त करून घेता येतो
- सर्व नागरी स्थानिक स्व. संस्थांकडून डेटा गोळा करण्यासाठी गुगल शीट आणि गुगल फॉर्म चा वापर टाळणे
- वारंवार डेटा मागविणे टाळणे व डेटाचा पुनर्वापर
- केंद्रीकृत विदा Centralized Data on Cloud

II - ICT आधारित घनकचरा संकलन व व्यवस्थापन प्रणाली

- शासन निर्णय दि. २२/०५/२०२३ अन्वये राज्यातील सर्व नगरपरिषदा/नगरपंचायती व 'ड' वर्ग महानगरपालिकामध्ये ICT आधारित घनकचरा संकलन व व्यवस्थापन प्रणालीची अंमलबजावणी सुरु आहे. या प्रणाली अंतर्गत सर्व नगरपरिषदा/नगरपंचायती व 'ड' वर्ग महानगरपालिकामधील Properties, Street Sweeping Points, Liquid Waste Points येथे Scanify Code लावून व त्यांचे geotagging करून प्रणाली अंतर्गत सामावेश केला जातो व त्याचे सफाई कर्मचारी यांचेमार्फत घनकचरा संकलन करतेवेळी दैनंदिन स्कॅनिंग करून सदर प्रणाली अंतर्गत घनकचरा संकलन व व्यवस्थापन बाबत monitoring केले जाते.
- सद्यस्थितीत ३६३ नगरपरिषदा/नगरपंचायती व १२ 'ड' वर्ग महानगरपालिकांमध्ये सदर प्रणालीची अंमलबजावणी पूर्ण करण्यात आली आहे.
- तसेच एकूण ०४ नगरपरिषदा/नगरपंचायती व ०५ 'ड' वर्ग महानगरपालिकांमध्ये सदर प्रणालीची अंमलबजावणी सुरु आहे व ११ नगरपरिषदा/नगरपंचायती व ०१ 'ड' वर्ग महानगरपालिकांमध्ये सदर प्रणालीची अंमलबजावणी करणे बाकी आहे.
- सदर प्रणालीचा राज्यस्तरीय डॅशबोर्ड नगरपरिषद प्रशासन संचालनालय येथे कार्यरत आहे व त्यानुसार सर्व कामकाजावर monitoring केले जाते.

९. नाविन्यपूर्ण उपक्रम (Office Management Reforms)

I - Integrated Web Based Portal (IWBP)

- स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये IWPS प्रणाली मार्फत एकूण २७ Module Live करण्यात आले आहेत. त्यापैकी Property Tax Module, Water Tax Module & Account Module हे मेजर Modules आहेत.
- उपलब्ध करून देण्यात आलेल्या Modules मार्फत मालमत्ता कर, पाणीपट्टी कर व इतर कर वसूली, लोकाभिमुख सेवा पुरविण्यात येतात तसेच सदर प्रणालीमार्फत अर्थसंकल्प व वार्षिक लेखे तयार करून नगरपालीकांच्या निधींवर सहनियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे
- स्थानिक स्वराज्य कर्मचाऱ्यांकडून घरोघरी कर वसुलीसाठी पीओएस (POS) मशीन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.
- PIL—१७१/२०१३ रस्त्यावरील खड्डे (POT Holes) व PIL-१५५/२०११ अंतर्गत होर्डिंग्ज आणि बॅनर्स करीता तक्रार प्रणाली व क्यूआर कोड सुविधा वापरण्यास सुरवात करण्यात आली आहे.
- स्थानिक स्वराज्य संस्था कर संकलनासाठी डिजिटल पेमेंट सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत उदा. बँक पेमेंट गेटवे, सुविधा, क्यूआर कोड सुविधा ई.
- स्थानिक स्वराज्य संस्थाद्वारे RTS अंतर्गत देण्यात येणाऱ्या ५६ पैकी ४१ सेवा IWBP प्रणाली मधून कार्यन्वित करण्यात आलेल्या आहेत.



II - लीगल मॅनेजमेंट सिस्टीम (LMS)



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामधील सुरु असलेल्या न्यायालयीन प्रकरणे हाताळणी सोयीस्कर होण्याच्या दृष्टीने नगरपरिषद प्रशासन संचालनालय मार्फत CSR निधीमधून डिजिटल लिटिगेशन मॅनेजमेंट प्रणाली (Litigation Management System) तयार करून घेतली आहे.

डिजिटल लिटिगेशन मॅनेजमेंट ही स्थानिक स्वराज्य संस्थामधील सुरु न्यायालयीन प्रकरण ट्रॅकिंग, प्रकरणाची सद्यस्थिती आणि प्रकरण सुनावणी तारीख स्वयंचलित अद्यावत करून त्याबाबतचे स्मरण करून देते. प्रकरणाची कायदेशीर संघांमधील दस्तऐवज सामायिकरण करते. तसेच डेटा-चालित धोरणात्मक निर्णयांना समर्थन देणारे, केस ट्रेंड आणि कायदेशीर खर्चाचे अहवाल देखील तयार करत आहे.

कर वसुलीसाठी पीओएस (POS) मशीन

स्थानिक स्वराज्य संस्था कर्मचाऱ्यांकडून घरोघरी कर वसुलीसाठी पीओएस (POS) मशीन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

राज्यातील १९८ स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये वापर सुरु करण्यात आलेला असून दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर POS मशीनव्दारे रक्कम रु. ३८,३८०/- कर देयक अदा करून डिजिटल पेमेंट सुविधेचा लाभ घेतला आहे.

धन्यवाद